# होमियम लेसर -मूत्र रोगावरील आधुनिक उपचार तंत्र

**डॉ.पंकज एन.माहेश्वरी**

श्री. पाटील, वय ५५ वर्षे, यांची काही दिवसांपूर्वी ॲंजिओप्लास्टी झाली आणि सध्या त्यांना वाढलेल्या प्रोस्टेट ग्रंथींमुळे लघवी होण्यास प्रतिबंध निर्माण झाला आहे. अशा रुग्णांच्या बाबतीत रक्तस्त्रावाच्या धोक्यामुळे नेहमीची उपचार पद्धती वापरणे शक्य नसते; अशा वेळी होमियम लेसर (ज्याला HoLEP असेही म्हणतात), ही एकमेव सुरक्षित उपचार पद्धती उपलब्ध आहे.

प्रोस्टेट या पुरुषांमधील लैंगिक ग्रंथी असून त्यांच्या प्रसरणामुळे मूत्रमार्गात, साधारणतः पन्नाशीनंतर, अडथळे निर्माण होतात. सामान्यतः लघवीची धार कमी होणे, लघवीला अडथळा, घाईची भावना होणे, रात्री वारंवार लघवीला जावे लागणे, लघवी होण्यासाठी जोर लावावा लागणे, लघवी होताना धारेमध्ये तुटकता येणे, लघवीद्वारे रक्तस्त्राव होणे अशी काही लक्षणे या समस्येमध्ये आढळून येतात.सुमारे २५ % पुरुषांमध्ये या समस्येसाठी शस्त्रक्रिया करावी लागते.यामध्ये सर्वसाधारणपणे प्रोस्टेटच्या उपचारासाठी TURP ही प्रचलित पद्धत वापरली जाते, ज्यामध्ये विद्युत प्रवाहाचा वापर करुन वाढलेल्या प्रोस्टेटचे छोटे छोटे भाग कापले जातात.TURP ही जरी यशस्वी उपचार पद्धती म्हणून मान्यता पावलेली आहे, तरी त्या पद्धतीचे लगेच आढळणारे किंवा दीर्घकाळ होणारे विपरित परिणाम (Side effects) आहेत.

HoLEP ही उपचार पद्धती यापेक्षा उजवी ठरते, कारण प्रोस्टेटच्या आकारमानामुळे यात कोणतीही मर्यादा येत नाही. फक्त एकवेळ हे उपचार वापरुन प्रोस्टेट निर्मूलन केले जाते (प्रोस्टेट काढून टाकण्याची प्रक्रिया).

या प्रक्रियेत बहुतांश वेळा बाहेरुन रक्तपुरवठा करण्याची गरज पडत नाही, रोग निर्मूलन चांगल्या प्रमाणात होते, रुग्णालयात वास्तव्य करण्याची गरज कमी होते आणि इतर शस्त्रक्रियेप्रमाणे लैंगिक जीवनात निर्माण होणाऱ्या समस्या व त्रास या शस्त्रक्रियेमुळे होत नाही.

आदित्य बिर्ला हॉस्पिटलचे डॉ. पंकज एन. माहेश्वरी, यांनी दिलेल्या माहितीनुसार होमियम लेसर द्वारे विविध प्रकारच्या मूत्र समस्यांवर उपचार केले जातात.उदा.मूतखडे, प्रोस्टेट युरेथ्रलची थोड्या प्रमाणातील वाढ (Benign Enlargement of Prostate Urethral), युरेट्रिक स्ट्रिक्चर्स (Ureteric strictures) आणि ओटी पोट व मूत्रमार्गाच्या संयोगापाशी (Pelvic - ureteric junction) निर्माण होणारे अडथळे.

होमियम लेसरचे तंत्रज्ञान हे आंतरराष्ट्रीय यशप्राप्त मानले जात आहे.लेसर शस्त्रक्रियेसाठी अदित्य बिर्ला मेमोरियल हॉस्पिटल मध्ये अत्याधुनिक व सुरेख सुविधा उपलब्ध आहेत, ज्यामध्ये स्वतंत्र राखीव शस्त्रक्रियेची खोली (Operation Theater) प्रशिक्षित वैद्यकीय चमू आणि सर्व प्रकारचे आधुनिक एंडोस्कोप्स् (Endoscopes) व यंत्रसामुग्रीचा समावेश होतो.

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*

*Important Safety Information – Information provided here is NOT medical advice or a prescription against any specific or general Symptom. Please consult your doctor before utilising the information.*
© *Arogyadarpan.com*